# 2018-19 या वर्षाकरिता अंतिम फेरलिलाव

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर
क्र.मशा/कार्या-2/गौख/आरआर- 1717
सोलापूर, दि.05/07/2019.

सन 2018-19 या वर्षाकरिता सोलापूर जिल्हयातील वाळू / रेती स्थळांसाठी **ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शनद्वारे (ई-लिलाव) लिलाव प्रक्रियेबाबतची सविस्तर** माहिती, लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता, वाळू लिलावाच्या अटी शर्ती, वाळूस्थळांबाबत तपशील, शासकीय किंमत, लिलावाबाबतचे सर्व अटी शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र रु.100/- च्या मुद्रांकावर छपाई करणेबाबतच नमुना व इतर सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर गौण खनिज शाखा, सोलापूर. तसेच सोलापूर जिल्हयातील सर्व उपविभागीय/ तहसिल कार्यालय येथे, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूरचे संकेतस्थळ www.solapur.nic.in व https://eauctioncollsol.abcprocure.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तरी इच्छुक व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांना या लिलावात भाग घेण्याकरीता आवाहन करणेत येत आहे.

**ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीने लिलाव करावयाचा वाळूस्थळांच्या लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि.06.07.19 ते 13.07.19 | दि.06.07.19 रोजी सकाळी 11.00 वाजले पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दि.13.07.19 पर्यंत सायंकाळी 6.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल (सुटटीचे दिवस वगळून) व कोणत्याही परिस्थितीस मुदतवाढ मिळणार नाही. |
| 2 | दि.06.07.19 ते 14.07.19 | नोंदणी केलेल्या व्यक्ती / संस्थानी दि.06.07.19 ते 14.07.19 या कालावधीत सकाळी 10.00 पासून सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे कार्यालय येथे संगणकीय नोंदणीत दाखल केलेले सर्व कागदपत्रे छायांकित प्रतीसह प्रत्यक्षात सादर करुन नोंदणी मान्य करुन घेणे आवश्यक राहील. (सुटटीचे दिवस वगळून) |
| 3 | दि.06.07.19 ते 14.07.19 | दि.06.07.19 सकाळी ते दि.14.07.19 सायं 6.00 पर्यंत निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय पध्दतीने) जमा करणे. |
| 4 | दि.18.07.19 | ई-निविदा भरलेल्या निविदा धारकांना ई-ऑक्शनसाठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीमध्ये संकेतस्थळावर खुली करुन देणेत येईल. |
| 5 | दि.18.07.19 | सकाळी 10.00 पासून ते दुपारी 2.00 पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु होईल. वेळ समाप्ती वेळीस बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनिटे प्रमाणे 3 (तीन) वेळा वाढ करणेत येईल. त्यानंतर ई-ऑक्शन करीता वेळ वाढवून दिला जाणार नाही. |
| 6 | दि.20.07.19 | दुपारी 3.00 पासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ई-ऑक्शन बाबतचा अंतिम निर्णय घेणेत येईल. |

**सही/*****
**(डॉ.राजेन्द्र भोसले भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**

**परिशिष्ट-अ**

| अ.क्र. | तालुका वाळूस्थळाचे नांव | नदीपात्रा लगतचे गट नंबर/ सर्व्हे नंबर | भुखंडा तील उपलब्ध वाळूसाठा ब्रासमध्ये | शासन निर्णय दि.03.01.18 मधील मुद्या क्र.10 (ब) (ii) तरतुदीनुसार मुळच्या किंमतीत 20% कमी करुन होणारी सुधारीत रक्कम (आकडे रुपयात) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 6 |
| 1 | मौजे.देगाव-मुंढेवाडी, ता.पंढरपुर. | देगाव - 46, 45, 40, 32, 31, 23, 22, 18, 17, 1 509, 508, 506 मुंढेवाडी- 208, 209, 210, 211, 212, 213, 219, 220, 221, 224, 225, 229, 237, 238, 239, 244, 245, 246, 247, 248, 261 ते 263, 266, 270 ते 272, 275 ते 279. | 83912 | 183179896 |
| 2 | मौजे.चळे, ता.पंढरपुर. | चळे- 525, 572, 573, 576 ते 580, 594 ते 597, 600 ते 603, 609. | 29177 | 63693391 |
| 3 | मौजे.सुस्ते-चळे, ता.पंढरपुर. | सुस्ते - 134 ते 139, 143 ते 149. 144, 143, 139, 138, 137, 136, 135, 134, चळे - 256, 258/1/पै, 258/1/पै, 261, 262, 272 पै | 55583 | 121337689 |
| 4 | मौजे.आंबे, ता.पंढरपुर. | अंबे - 442, 435, 434, 433, 429, 428, 426, 425, 424, 423, 421, 420, 419, 445, 446. | 23279 | 50818057 |
| 5 | मौजे.कौठाळी-व्होळे, ता.पंढरपुर. | कौठाळी - 673 ते 678, 591 ते 610, 655 ते 659, 668 पै. व्होळे-13 ते 15, 63, 77, 78, 84, 87, 105, 113ते115, 117ते119, 121 पै, 123, 125, 126, 127, 128, 129. | 40707 | 88863381 |
| 6 | मौजे.गुडडेवाडी, ता.अक्कलकोट | गुडडेवाडी - 1 ते 21 सलग | 28452 | 62110716 |
| 7 | मौजे.शेगाव, ता.अक्कलकोट | शेगाव - 56 ते 65 सलग | 20693 | 45172819 |
| 8 | मौजे.धारसांग, ता.अक्कलकोट | धारसंग - 80, 82, 83 | 21124 | 46113692 |
| 9 | मौजे.भंडारकवठे, ता.दक्षिण सोलापूर | भंडारकवठे साठा क्र.1 - 9 ते 31. | 23671 | 51673793 |
| 10 | मौजे.बाळगी, ता.दक्षिण सोलापूर | बाळगी - 1 ते 25, 105, 111 ते 120, 123 ते 125, 129, 130 ते 132. | 36514 | 79710062 |
| 11 | मौजे.सादेपुर, ता.दक्षिण सोलापूर | सादेपुर - 17, 18. | 18502 | 40389866 |
| 12 | मौजे.कारकल, ता.दक्षिण सोलापूर | कारकल - 46, 1, 253, 262, 261, 263, 264, 269 ते 278. | 19876 | 43389308 |
| 13 | मौजे.टाकळी, ता.दक्षिण सोलापूर | टाकळी - 5, 6, 308, 309, 310, 311, 312, 313, 314, 315. | 18502 | 40389866 |
| 14 | मौजे.कुरघोट, ता.दक्षिण सोलापूर | कुरघोट - 58, 59, 65, 76. | 20406 | 44546298 |
| 15 | मौजे.हत्तरसंग, ता.दक्षिण सोलापूर | हत्तरसंग - 20 ते 22, 145, 146, 157 | 20406 | 44546298 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16 | मौजे.बरुर, ता.दक्षिण सोलापूर | बरुर- 2 ते 6 | 21767 | 47517361 |
| 17 | मौजे.चिंचपुर, ता.दक्षिण सोलापूर | चिंचपुर - 13, 14, 17, 18, 20, 21, 30, 31, 33, 34, 76 ते 80. | 32106 | 70087398 |
| 18 | मौजे.कुडल, ता.दक्षिण सोलापूर | कुडल - 15 ते 20, 5 ते 8. | 21767 | 47517361 |
| 19 | मौजे.वडापुर-सिध्दापुर, ता.दक्षिण सोलापूर-मंगळवेढा | वडापुर - 8, 7, 6, 5, 1, 283, 282, 281, 280, 279, 278, 276, 275, 274, 273, 272. सिध्दापुर - 27, 28, 29, 38, 40, 45, 46, 47, 48. | 76325 | 166617475 |
| 20 | मौजे.मिरी-तांडोर, ता.मोहोळ-मंगळवेढा | मिरी - 68 पै, 55, 54 पै. तांडोर - 178 ते 182, 184, 185, 192, 200, 201, 203, 205, 207, 219, 223, 225, 227, 228, 231, 232, 240, 242 | 36212 | 79050796 |
| 21 | मौजे.बेंबळे-वाफेगाव, ता.माढा-माळशिरस | बेंबळे - 515 पै, 516, 520, 517. 23 ते 28, 30, 32, 33.वाफेगाव - 212 ते 215, 227, 224, 225, 226, 198, 129, 33, 204, 154, 198, 1 ते 6, 10 ते 20, 24 ते 29, 39 | 30954 | 67572582 |
| 22 | मौजे.चांदज, ता.माढा | चांदज - 135,156,157,158,162, 164,165,182,187,189,190, 206, 207,208,209,210, 213, 220, 224, 226. | 25442 | 55539886 |
| 23 | मौजे.गारअकोले, ता.माढा | गारअकोले - 47 ते 53, 40 ते 43, 38, 31 ते 35, 25, 23, 18, 19, 1 ते 3, 136, 137, 115, 87, 105 ते 112, 102, 101, 97 ते 99, 89 ते 93. | 25442 | 55539886 |
| 24 | मौजे.टाकळी, ता.माढा | टाकळी - 2 ते 7, 9 ते 12, 160 ते 165, 168 ते 170, 175, 176, 180, 181, 185 ते 190, 196, 197. | 38163 | 83309829 |
| 25 | मौजे.माळेगाव, ता.माढा | माळेगाव- 60, 61/ब, 63, 70 ते 72, 81, 88. | 19081 | 41653823 |
| 26 | मौजे.शेवरे, ता.माढा | शेवरे- 2 ते 9, 26 ते 28, 30, 32, 197 ते 208, 211 ते 212. | 25442 | 55539886 |
| 27 | मौजे.तरटगाव-खळवे, ता-पंढरपूर-माळशिरस. | तरटगाव - 2 ते 4, 75 ते 56. खळवे - 1 ते 28, 348 ते 350, 364 ते 367, 371. | 22527 | 49176441 |
| 28 | मौजे.उंबरे(पागे) - उबंरे(वेळापुर), ता-पंढरपूर-माळशिरस. | उंबरे (पागे) - 1, 17 ते 22, 31 ते 41, 50, 51, 60, 61, 70.<br>उंबरे (वेळापुर) - 1 ते 4, 5 ते 16, 437, 446, 447, | 19081 | 41653823 |
| 29 | मौजे.ओझेवाडी-मुंढवी, ता.पंढरपूर-मंगळवेढा. | ओझेवाडी - 166,165,157, 158, 140, 139, 130, 128, 109, 77, 76, 74 ते 70, 67 ते 65, 17, 1, 4, 16, 12, 11, 10, 8, 7, 3 ते 1, 524, 525, 550.<br>मुंढवी - 424, 425, 436 ते 440, 442, 511, 555, 556, 558, 559, 581 ते 587, 36, 37, 43, 45, 52, 55, 58, 60 ते 63, 65 ते 67. | 18127 | 39571241 |

**सही/*****
**(डॉ.राजेन्द्र भोसले** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**

**लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता:-**

(1) ई-निविदा व ई-ऑक्शन प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या सर्वांना ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकरिता (Registration) (संगणकीय नोंदणीकरिता) ई-मेल आयडी, पॅनकार्ड, नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, प्रतिज्ञापत्र व GST क्रमांक, Digital Signature Class-2/3, आधार क्रमांक वरील नमुद कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

(2) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क, रु.5000/- लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क रु.5000/- ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

(3 ) लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक लिलावधारकास नोंदणी शुल्क (Registration Fee) ही प्रति व्यक्ती/संस्था यांना रु.2950/- अनिवार्य आहे व एकदाच भरणा करावी लागेल. तसेच कार्यवाही शुल्क रु.1593/- प्रति निविदेस भरणा करणे बंधनकारक राहील. सदरची देय रक्कम ई-पेमेंट जसे नेट बँकिंग/क्रेडीट कार्ड/ डेबिट कार्ड (RTGS) पध्दतीने करुन वरील संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन खरेदी करावे लागेल.

(4) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून इच्छित वाळूस्थळाच्या हातची किंमतच्या (Upset Price) 25% रक्कम जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या नावे असलेल्या ICICI या बँक खात्यात **RTGS** द्वारे भरावी लागेल.

(5) जी व्यक्ती/संस्था ज्या वाळूगटाकरिता ई-निविदा भरेल अश्याच व्यक्ती/संस्थेला ई-ऑक्शन मध्ये भाग घेता येईल. ई-निविदा ही ई-ऑक्शन झालेनंतरच खुली करणेत येणार आहे या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच ई-निविदा आणि ई-लिलाव यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक दर नमुद असेल त्या ठेकेदारास लिलाव देणेत येईल.

(6) सर्वोच्च बोलीच्या देकार/निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित करणेत येईल. उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसात भरणार असल्याचे हमीपत्र रु.100/- च्या मुद्रांकनावर सादर करणे आवश्यक आहे.

(7) लिलावधारकाने देकाराची उर्वरित 3/4 रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास वाळू गटाचा ताबा दिला जाणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली 1/4 रक्कम जप्त करणेत येईल व अशा वाळूगटाचा शासन नियमाप्रमाणे फेरलिलाव करणेत येईल त्याबाबत कोणतेही तक्रार करता येणार नाही.

(8) ई-निविदा/ई-ऑक्शन मध्ये भाग घेणाऱ्या सर्व व्यक्तीस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील. लिलावधारकास निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी व वाळू भरणेसाठी कोणतेही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय राहणार नाही.

(9) ई-ऑक्शनधारकास/ई-टेंडरधारकास सर्वोच्च बोलीव्यतिरिक्त पुढील प्रमाणे इतर शासन देय रक्कम जमा करणे आवश्यक राहील. (I) भूपृष्ठ भाडे (संबंधित वाळूस्थळाच्या क्षेत्रानुसार) (II) G.S.T. रक्कम. (III) TDS रक्कम (IV) भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सोलापूर यांचे नावे सर्वेक्षण शुल्क. (V) मुद्रांक शुल्क सर्वोच्च बोलीच्या 0.2%. (VI) जिल्हा खनिज प्रतिष्ठान (ना-परतावा) सर्वोच्च बोलीच्या 10%. (VII) पर्यावरण शुल्क (बँक गँरटीच्या स्वरुपात) सर्वोच्च बोलीच्या 2%. (VIII) राज्य पर्यावरण विभागाने मंजुर केलेल्या पर्यावरण व्यवस्थापन आराखडयात नमुद केलेप्रमाणे रक्कम अदा आवश्यक राहील व सदर सर्व रक्कमा किती भराव्या लागतील याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (गौणखनिज शाखा) येथुन माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. (IX) संबंधित वाळूस्थळाच्या हातच्या किंमतीच्या 20% अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक राहील.

याव्यतिरिक्त शासनाकडुन शासन देय रक्कमाबाबत कोणतेही फेरबदल प्रस्तावित केले गेलेस ते सर्व लिलावधारकास बंधनकारक राहतील

(10) लिलावामध्ये सर्वोच्च बोली बोलणाऱ्या ई-ऑक्शनधारकास (ई-लिलावधारकास) / ई-टेंडरधारकास (ई-निविदाधारकास) त्यांनी संपूर्ण रक्कम भरलेनंतरच वाळूगटाचा ताबा देणेत येईल. ताबा घेतल्याची तारीख काहीही

असली तरी वाळूस्थळाची अंतिम मुदत दि.30 सप्टेंबर 2019 किंवा वाळूस्थळाचा ताबा जितक्या परिमाणासाठी देण्यात आला आहे त्याचे उत्खनन संपेल यापैकी जो कालावधी अगोदर संपुष्टात येईल ते अंतिम धरण्यात येईल.

(11) ज्या व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांना या लिलावात भाग घेण्याकरीता ऑनलाईनद्वारे नोंदणी (Registration) केली आहे त्यांना पुनश्च एकदा नोंदणी (Registration) करणे आवश्यकता नाही.

(12) ज्या व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांनी ई-निविदामध्ये भाग घेतलेला आहे त्यांना ई-लिलावामध्ये ही भाग घेणे आवश्यक राहील.

**<u>वर नमुद केलेल्या अटी व शर्ती तसेच संकेतस्थळावर नमुद केलेल्या लिलावाबाबतचे सर्व अटी शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या मुद्रांकावर सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.</u>**

**ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीने लिलाव करावयाचा वाळूस्थळांच्या लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

**<u>लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता संकेतस्थळावर नमुद केलेल्या लिलावाबाबतचे सर्व अटी शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या मुद्रांकावर सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.</u>**

**ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीने लिलाव करावयाचा वाळूस्थळांच्या लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि.06.07.19 ते 13.07.19 | दि.06.07.19 रोजी सकाळी 11.00 वाजले पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दि.13.07.19 पर्यंत सायंकाळी 6.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल (सुटटीचे दिवस वगळून) व कोणत्याही परिस्थितीस मुदतवाढ मिळणार नाही. |
| 2 | दि.06.07.19 ते 14.07.19 | नोंदणी केलेल्या व्यक्ती / संस्थानी दि.06.07.19 ते 14.07.19 या कालावधीत सकाळी 10.00 पासून सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे कार्यालय येथे संगणकीय नोंदणीत दाखल केलेले सर्व कागदपत्रे छायांकित प्रतीसह प्रत्यक्षात सादर करुन नोंदणी मान्य करुन घेणे आवश्यक राहील. (सुटटीचे दिवस वगळून) |
| 3 | दि.06.07.19 ते 14.07.19 | दि.06.07.19 सकाळी ते दि.14.07.19 सायं 6.00 पर्यंत निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय पध्दतीने) जमा करणे. |
| 4 | दि.18.07.19 | ई-निविदा भरलेल्या निविदा धारकांना ई-ऑक्शनसाठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीमध्ये संकेतस्थळावर खुली करुन देणेत येईल. |
| 5 | दि.18.07.19 | सकाळी 10.00 पासून ते दुपारी 2.00 पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु होईल. वेळ समाप्ती वेळीस बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनिटे प्रमाणे 3 (तीन) वेळा वाढ करणेत येईल. त्यानंतर ई-ऑक्शन करीता वेळ वाढवून दिला जाणार नाही. |
| 6 | दि.20.07.19 | दुपारी 3.00 पासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ई-ऑक्शन बाबतचा अंतिम निर्णय घेणेत येईल. |

सर्वोच्च ई-ऑक्शनधारकास (ई-लिलावधारकास) / ई-टेंडरधारकास (ई-निविदाधारकास) सर्वोच्च बोलीनुसार वाळूस्थळ मंजूर करणेत येईल. ज्यांचे नावे लिलाव मंजुर होईल त्या लिलावधारकास शासन निर्णय दि.03 जानेवारी 2018 मधील, पर्यावरण विभाग, मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली याचे आदेशातील व जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

ई-टेंडरिंग (ई-निविदा) अथवा ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारण्याचे, नाकारण्याचे अथवा रद्द करण्याचे तसेच सदर लिलावामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

ज्या व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांना या लिलावात भाग घेण्याकरीता ऑनालाईनद्वारे नोंदणी (Registration) केली आहे त्यांना पुनश्च एकदा नोंदणी (Registration) करणे आवश्यकता नाही.

**ई-निविदा/ई-लिलावाच्या वेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विद्युत किंवा अन्य तांत्रिक अडचणीमुळे अडथळा आल्यास जिल्हा प्रशासन जबाबदार राहणार नाही**.

नोंदणी (Registration), ई-टेंडरिंग (ई-निविदा), ई-ऑक्शन (ई-लिलाव) मध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास संपर्क दुरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. 1) सोनू टँक, 07968136878, sonu@abcprocure.com. 2) सताब्दी डे, 07968136845, satabdi@abcprocure.com. 3) नंदल वालेरा, 07968136850, support@abcprocure.com. यांचेशी संपर्क साधावा.

**सही/*****
**(डॉ.राजेन्द्र भोसले भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर**.

टीप:- **संबंधित वाळूस्थळास ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेमध्ये कमीत कमी 3 निविदाधारक असणे आवश्यक आहे. 3 पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतल्यास संबंधित ई-निविदा व ई-लिलाव स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्वस्व अधिकारी जिल्हाधिकारी यांना राहील**.

**वाळूघाट ई-निविदा/ई-ऑक्शन धारकाने स्वखर्चाने रु.100/- च्या प्रतिज्ञापत्रावर द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

**हमीपत्र**

मी/आम्ही ------------------------------------------------------------ रा.-------------------------- ---------- ता-------------------जि.---------------------- माझे/आमच्या संस्थेचे पॅन क्रमांक---------------- GST क्रमांक ------------------------ आधार क्रमांक

1) मला सदर वाळूस्थळ मंजूर झाल्यास मी भरणा केलेली 25% इसारा रक्कम वजा जाता सर्वोच्च बोलीच्या 1/4 रक्कम लिलावाच्याच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईनद्वारे भरणा करेन. तसेच उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन 15 दिवसाच्या आत ग्रासप्रणालीद्वारे शासकीय खजिन्यात भरणा करणेची हमी देत आहे. तसेच अधिसुचनेत नमुद केलेनुसार मी निवडलेल्या वाळूस्थळाच्या सर्वोच्च बोलीव्यतिरिक्त इतर सर्व शासन देय रक्कम 15 दिवसाच्या आत शासनजमा करेन. सदरची रक्कम विहित मुदतीत ग्रासप्रणालीद्वारे शासकीय खजिन्यात भरणेस मी कसुरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% इसारा रक्कम जप्त करणेस माझी हरकत नाही.

2) मी/आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी/आम्ही सोलापूर जिल्हयात सन 2018-19 करिता होणाऱ्या वाळुस्थळ लिलावामधील निवडलेल्या (ई-निविदा-ई-ऑक्शनद्वारे) वाळूस्थळांच्या अनुंषगाने उक्त अधिसुचनेतील ई-निविदा, ई-लिलावातील सर्व अटी व शर्ती तसेच सोलापूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध लिलावाची **सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती क्र. 1 ते 67, विशेष निर्देश व अटी शर्ती क्र.1 ते 26, करारनामा बद्यल** माहिती करुन घेतली आहे या सर्व अटी व शर्ती मान्य असुन त्याचे पालन करणे मला बंधनकारक आहे. मी/आम्ही निवडलेल्या वाळूस्थळाबाबत निविदेत प्रस्तावित केलेनुसार 25% इसारा रक्कम RTGS द्वारे भरुन सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग होत आहे.

3) नियमानुसार फेरनिविदा/फेरलिलावद्वारे दुसऱ्या निविदाधारकास सदरची वाळूस्थळ मंजूर केलेस माझी काही हरकत नाही. सदरचा फेरनिविदा/फेरलिलावाद्वारे शासनाच्या महसूलाचे जे नुकसान होईल त्या नुकसानाची भरपाई जमीन महसूलाची थकबाकी म्हणून माझेकडुन वसूल करणेस मी संमती देत आहे.

4) फेरनिविदा/फेरलिलावाद्वारे पूर्वी मंजुर करणेत आलेल्या लिलावाच्या रक्कमेपक्षा अधिकची रक्कम आल्यास अधिकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

5) मी/आम्ही असेही घोषित करतो की, मला यापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या कुठल्याही जिल्हयात कोणत्याही कारणास्तव जाहील लिलावप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रतिबंध (काळया यादीत) केलेले नाही

6) मी/आम्ही लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा असल्याची वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध असल्याचे, तसेच वाळूस्थळात वाळू ही मातीमिश्रीत नसल्याचे खात्री केली आहे. त्यामुळे सदर परिस्थितीबाबत मी भविष्यात अथवा वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळूलिलावापोटी शासन जमा केलेल्या रक्कमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करणेबाबत कोणतेही तोंडी/लेखी शासनास/जिल्हाधिकारी कार्यालयास तक्रार करणार नाही.

वरीलप्रमाणे सर्व माहिती खरी असून यामध्ये काही चुकीची अथवा दिशाभुल करणारी तसेच खोटी माहिती आढळल्यास मी भारतीय दंड विधान संहिता 1861 कलम 199 व 200 नुसार शिक्षेस पात्र राहील.

आपला विश्वासू.

( )

ठिकाण:-

सोलापूर:-

**टीप:- वर नमुद हमीपत्र रु.100/- प्रतिज्ञापत्रावर नोटरी करुन संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करुन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावे.**

**वाचा-**

1. महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र गौखनि-10/0615/ प्र.क्र.289/ख दि.03.01.18.
2. मा.आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.मह/2/गौख/कावि-397/18 दि.13/11/2018.
3. राज्य पर्यावरण समिती क्र.1 यांनी दि.05.02.2019 नुसार प्राप्त पर्यावरण मान्यता.
4. राज्य पर्यावरण समिती क्र.2 यांनी दि.19.02.2019 नुसार प्राप्त पर्यावरण मान्यता.
5. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.मह/2/गौख/कावि-164/19 दि.28 जुन 2019

---

## (अ) वाळू लिलावधारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती.

1) वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपेसट प्राईस (हातची किंमत) पेक्षा अधिक बोलीने ई-निविदा भरुन लिलावाला सुरुवात करणेत येईल.

2) ई-निविदा/ई-ऑक्शनद्वारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास मा.विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळूगटाचा 10 दिवसाच्या आत फेरलिलाव करणेत येईल.

3) ई-निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला 1/4 अनामत रक्कम ही निविदा भरताना ऑनलाईन (Online) पध्दतीने भरावी लागेल. बोलीदाराची उच्चत्तम बोली ई-निविदा/ई-ऑक्शन नंतर स्विकारणेत येईल. ज्या बोलीदारांची निविदा स्विकारण्यात येणार नाहीत त्यांची अनामत रकमा लिलाव संपलेनंतर ऑनलाईन (Online) पध्दतीने ई-निविदा भरताना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर ऑनलाईन (Online) पध्दतीने जमा केली जाईल.

4) ई-निविदा / ई-ऑक्शन द्वारे लिलाव घ्यावयाच्या वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही. वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

5) ई-निविदा / ई-लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा राहील.

6) ई-निविदा / ई-लिलावातील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर ई-निविदेनुसार उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असलेबाबत हमीचे दायित्व स्वीकारण्या-या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर त्वरीत करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वर नमुद अट क्र.3 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75% रक्कम सर्वोच्च ई निविदा / ई-लिलाव स्विकारल्यापासून 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकांने उर्वरित 75% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ताबा देण्याचे आदेश निर्गमित केले जातील त्यानंतर तहसिलदार यांचेकडून लिलावधारकांनी अटी व शर्तीमधील सर्व बाबींची पुर्तता केली असल्याचे खात्री केल्यानंतर लिलावधारकास वाळू स्थळाचा ताबा देण्यात येईल.

7) लिलावधारकाने देकाराची उर्वरित 3/4 रक्कम विहित कालावधीत न भरलेस तसेच विहित कालावधीत वर नमुद केलेप्रमाणे करारनामा (हमीपत्र) करुन न दिलेस वाळू स्थळाचा ताबा देणेत येणार नाही. तसेच अश्या लिलावधारकाची अग्रीम स्वरुपात केलेली 1/4 रक्कम जप्त करणेत येईल.

8) कोणत्याही कारणास्तव वाळू / रेती लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या वाळू क्षेत्राचा नव्याने ई-निविदा/ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्यात येईल फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किमंतीपेक्षा कमी किमंत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलीची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापी फेर लिलावात पूर्वीच्या किमंतीपेक्षा अधिक (जादा) किमंत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

9) लिलावधारक त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्यास जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे निर्णय अंतिम असतील.

10) विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून वाळू काढता येणार नाही.

11) जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविणेत यावी.

12) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतू लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी त्याने ज्या किमंतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रककम परत करतांना लिलावाची देकारची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळू साठा विचारात घेवून त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

13) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची / रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अश्या प्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी / तारेचे / लोंखडी / भिंतीचे / दगडाचे कुपंण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक / चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा / रेतीचा साठा मुदत

संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या/रेतीच्या किमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस दिले जाणार नाहीत.

14) लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी आवश्यक परवाने/ बारकोडींग असलेले पासेस पुस्तके लिलावधारकाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. असे पासेस उपलब्ध करुन देताना लिलावधारकास वाळू गटात उपलब्ध असलेला अंदाजीत वाळू साठा व उत्खनन विचारात घेवून आवश्यक तेवढेच पासेस / पुस्तके लिलावधारकास देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने दक्षता घ्यावी. असे वैध परवाने / पासेस धारण करणा-यांनाच वाळू/रेतीची वाहतूक करता येईल.

15) लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था / संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

16) प्रत्येक वाहतूक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहिल.

17) लिलावधारकोने त्याला वाटप केलेल्या / मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे.

18) लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलाव वर्षाच्या दिनांक 30 सप्टेंबर 2019 रोजी संपुष्टात येईल किंवा आदेशात दिलेल्या परिमाणाचे उत्खनन संपेल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावाधीपर्यंत अनुज्ञेय राहील. अधिसुचनेत नमूद केलेल्या अंदाजित वाळूसाठया एवढाच वाळू उत्खनन करण्योस अनुज्ञेय राहील. तथापि, लिलाव कालावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत पाण्याखालील वाळूचे दि. 10 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, केवळ मनुष्यबाळाचे सहाय्याने वाळूचे / रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपतीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही. वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापुर्वी खात्री करुन घेण्याची जबाबादारी संबंधित लिलावधारकांची राहील. वाळू घाटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केलेनंतर यासंबधीची कोणतेही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीच्या विचार केला जाणार नाही.

19) उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी

कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.  अथवा वाळूघाट / रेती बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

20) नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती / वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती / वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

21) रेतीचे / वाळूचे नदीपात्रातून संबंधित तहसीलदार, जिल्हा खनिकर्म अधिकारी, व  भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने यांचे संयुक्त सर्वेक्षणानंतर आदेशामध्ये विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. नदीपात्र यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

22) लिलावधारकाने गावक-याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

23) वाळू / रेती उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

24) लिलावधारकाने वाळू / रेती वाहतूकीसाठी सक्षम प्राधिका-यांनी म्हणजे जिल्हा खनिकर्म अधिका-याने प्रमाणित व स्वाक्षरीत केलेली वाहतूक पावती वाळू / रेतीची वाहतूक करणा-या प्रत्येक वाहनासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील वाळू / रेतीची वाहतूक करणा-या वाहनास तो वाहून नेईल इतक्या परिमाणाची वाहतूक पावती दयावी.  कोणतेही वाहन पावती पेक्षा अधिक परिमाणाची वाळू / रेती  वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने वाळू / रेतीचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू /  रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

25) गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे. आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबधीत महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर. यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत.

26) वाळू स्थळापोटी अनामत रक्कम म्हणून भरलेली वाळूस्थळाच्या हातच्या किंमतीच्या 20% रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम पुर्णत: जप्त करण्यात येईल.

27) वाळू / रेती उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार या सर्वांना 24 तासात कळविले पाहिजे.

28) लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

29) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

30) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

31) अवैध वाळू /रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7)व (8) नुसार तसेच इतर लागू होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

32) लिलावधारकास लिलाव / ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावनंतर भागीदारही घेता येणार नाही.

33) ई-निविदा, ई-ऑक्शन मध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती / संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहातील.

34) सर्वोच्च बोलीच्या देकार / निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रक्कमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्याच दिवशी प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित करणेत येईल. तसेच उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसात भरणा करणार असल्याचे, राज्य पर्यावरण समितीने मंजुरी दिलेल्या अटी, शर्ती व लिलावाच्या अधिसुचनेतील अटी व शर्ती मान्य असलेचे व त्याचे काटेकोरपणे अनुपालन करणार असल्याचे हमीपत्र रु.100/- च्या मुद्राकांनावर लिलाव घोषित झालेल्या दिवशी सादर करणे बंधनकारक राहील.

35) लिलावधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारण अनिवार्य राहील. विहित केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहणेसाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक, व कर्मचारी याची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

36) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.19628-1629/2009 मध्ये दि.27.02.2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहणेसाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू गटातून पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंतच लिलावधारकाला वाळूचे उत्खनन करता येईल.

37) नदीपात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहणेसाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पाणी कमी होणार नाही. याबाबत योग्य ती उपाययोजना करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

38) लिलावधारकास लिलावात मंजुर केलेल्या वाळू परिमाणाइतकेच उत्खनन करणेचे अधिकार प्राप्त होईल.

39) वाळूचे उत्खनन व वाहतूक सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल या कालावधी व्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन व वाहतूक अवैध समजून कारवाई करणेत येईल.

40) कोणत्याही रेल्वे / रस्ते पूलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फूट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

41) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक राहील.

42) सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था केलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलीकडे वाळू उत्खनन करणे आवश्यक राहील.

43) लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवूण विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रालीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवडयाला उपविभागीय अधिकारी / तहलिसदार यांना सादर करावे व त्याची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे.

44) नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटामधून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू भरणेसाठी पोकलेन, जेसीबी तसेच इतर कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञ ेय नाही.

45) पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केलेचे निदर्शनास आल्यास लिलावधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करणेत येऊन लिलाव परवाना रद्य करणेत येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) (8) तसेच पर्यावरण सरंक्षण अधिनियम 1986 नुसार कारवाई करणेत येईल.

46) अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार/लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करणेत येईल.

47) लिलावधारक/परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण सरंक्षण अधिनियम 1986 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

48) वाळूचे / रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहिल. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

49) वाळूचे उत्खनन फक्त मनुष्यबळाचे सहाय्याने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही. मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार वाहत्या पाणीखालील वाळुचे उत्खनन करता येणार नाही. तसे केल्यास राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम-2010, पर्यावरण सरंक्षण अधिनियम-1986 नुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणूक करावयाचे असल्यास अवलंबण्याची कार्यपध्दती.**

50) लिलावधारकास सदर वाळू वाळूगटाच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करणेसाठी अकृषिक परवान्यासाह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल, सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल.

51) सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातुन जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल.

52) प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी 24/7 छायाचित्रण होणेसाठी CCTV बसविणेची जबाबदारी लिलावधारकाची राहील. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतूकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरणेत येते त्या ठिकाणी बसविणेत यावा व या वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणसाठी वापरणेत यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेले CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील.

53) लिलावधारकांनी बसविलेले CCTV चा Address शासनाच्या महसूल विभागाकडे/मा.विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेले सी.डी दर 15 दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील. तसेच सदरचे छायाचित्रण स्पष्टता ही चांगल्या प्रतीचे (HD Quality) ची असणे आवश्यक आहे.

54) लिलावधारकाकडून बसविणेत आलेले CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, मंजुर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस CCTV बंद होता तेवढे दिवस सरासरी काढून केलेले उत्खनन सरासरी केले असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतिब्रास रक्कम परिगणीत करुन त्या दराने CCTV कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या

रक्कमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करणेत येईल. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असला तरीही पूर्ण दिवसासाठी CCTV बंद असल्याचे समजून वरीलप्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसुली करणेत येईल.

55) प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी तसेच वाळू साठा केलेल्या ठिकाणी CCTV कॅमेरा अशा पध्दतीने बसवावे की त्या ठिकाणी साठवणूक केलेल्या संपूर्ण जागेचे चित्रीकरण CCTV कॅमेरा मध्ये होईल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केले आहे त्या वाळू/रेतीचा साठा मंजूर कालावधीनंतर 10 दिवसाच्या आत उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाहीतर तो शासनाच्या मालकीचा होईल व अश्या वाळूच्या/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती साठा करण्यासा परवाना दिला जाणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस दिला जाणार नाही.

56) लिलावधारकाला नदीपात्रातून वाळू उत्खनन करणेसाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

57) लिलावधारकाने वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे उपविभागीय अधिकारी, तहसिलदार कार्यालयात दर आठवडयास जमा करणे आवश्यक राहील. तसेच सदर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी प्राधिकृत करेल अशा कोणत्याही अधिका-यास व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

58) वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार या सर्वांना 24 तासात कळविले पाहिजे.

59) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

60) एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही.

61) अवैध वाळू / रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदी नुसार तसेच इतर कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

62) लिलावधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना द्यावी. कोणत्याही परिस्थितीत सदर वाहना व्यतिरिक्त इतर वाहनामार्फत वाहतूक होणार नाही तसेच सदर वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेणेची जबाबादारी लिलावधारकाची राहील.

63) वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले वाहन वापरणेत येईल.

64) लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर तसेच शासनाने वेळोवेळी लिलाव कालावधी दरम्यान विहित केलेल्या इतर कर इत्यादी शासकीय नियमानुसार शासनास अदा करणे बंधनकारक राहील.

65) या व्यतिरिक्त वाळू उत्खननासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने, मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली, व शासनाने वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

66) लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रामणे अदा करावेत.

67) लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीस ग्रामस्थांचा विरोध होणार नाही याबाबत लिलावधारकाने स्थानिक ग्रामस्थासोबत खातरजमा करुन ई-निविदा/ई-लिलाव मध्ये भाग घ्यावा.

## (ब) विशेष निर्देश व अटी शर्ती

**याशिवाय वाळु/रेती ठेकेदाराना जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेली खालील कार्यप्रणाली कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याशिवाय साठयाचा ताबा देण्यात येणार नाही.**

1) लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील वाळूची / रेती वाहतूक करणा-या वाहनास मोटार वाहन कायदा 1988 नुसार अनुज्ञेय परिमाणाची व सलग क्रमांकाची वाहतूक पावती दयावी. सदर पावती स्कॅनरगनने स्कॅन करुनच देण्यात यावी. स्कॅनगन व त्याबाबतचे सॉफटवेअर लिलावधारकास खाली नमूद केलेनूसार स्वत: घेणे बंधनकारक राहील.

2) एखादे वाहन तपासणीमध्ये पावतीसह आढळून आले परंतू सदर पावती स्कॅन केली नसल्याचे आढळून आल्यास अशा प्रकारचे गौण खनिज अवैध व शासकिय मालमत्तेची चोरी समजण्यात येईल व याबाबत लिलावधरकावर दंडात्मक / फौजदारी/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

3) कोणतेही वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची वाळू / रेती वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, तसेच सदर वाहनावर मोटार कायद्यानूसार व अन्य कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

अ) वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायसन्स वर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हयाकरीता 30 दिवस, दुसऱ्या गुन्हयाकरिता 60 दिवस व तिसऱ्या गुन्हायाकरिता 90 दिवस या प्रकारे निलंबित केले जाईल.

ब) तसेच गौण खनिजाची व वाळूची वाहतूक करताना वाहनांच्या हौद्याची उंची वाढविणे किंवा वाहतूक करणा-या वाहनास ताडपत्री/प्लास्टीक कव्हरने न झाकता वाहतूक करणे अशा वाहनावर मोटार कायद्यानूसार व अन्य कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

क) वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायसन्सवर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हयाकरीता सहा महिन्याकरीता निलंबित केले जाईल अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करताना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हींग लायसन्स कायमस्वरुपी रदद करण्यात येईल.

4) पावतीमध्ये नोंदी घेताना कार्बन पेपरचा वापर करणे अनिवार्य आहे, म्हणजेच पावतीची पहिली प्रत बॉलपेनने लिहावी व त्याखालील दोन्ही प्रती या पहिल्या प्रतीच्या व दुस-या प्रतीच्या खाली कार्बन टाकून नोंद घेण्यात याव्यात. तसेच पहिल्या प्रतीच्या मागच्या बाजूवर देखील कार्बन उमटेल अशा प्रकारे डबल कार्बन वापरावा. म्हणजेच पहिल्या पावतीच्या मागे आणि दुस-या व तिस-या पावतीच्या समोरील बाजूवर केवळ कार्बनच्याच नोंदी राहतील, पेनच्या नोंदी असणार नाहीत. अशा प्रकारचा कार्बन वापरुन पावती पुस्तकामध्ये नोंद आढळून न आल्यास देण्यात आलेली पावती अवैध घोषीत करुन उत्खनन केलेली व वाहतूक केलेल्या वाळू व वाहनावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल

5) वाळू स्थळामधून वाळू उत्खनन केल्यानंतर शिल्लक राहीलेली खडवाण नदीपात्रामध्ये टाकून नदीपात्र सपाट करण्याची जबाबदारी संबधित लिलावधरकाची राहील. लिलावधारकाने लिलावाची मुदत संपल्यानंतर नदी पात्राचे सपाटीकरण 1 महिन्यात न केल्यास भविष्यात होणाऱ्या अपघातास अथवा घडणा-या परिणामास लिलावधारक सर्वस्वी जबाबदार राहतील. तसेच लिलावापोटी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

6) वाहतूक ठेकेदारांनी ठेक्याच्या स्थळावर विक्री केलेल्या वाळू बाबतच्या नोंदीचे रजिस्टर ठेवणे आवश्यक असून ठेकेदारांना देण्यात आलेल्या पावत्यांचा हिशेब दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसील कार्यालयास सादर करावा. ठेकेदारांकडे गौण खनिज/वाळू उत्खननाबाबत नियमानुसार ठेवण्यात आलेल्या रजिस्टरमधील नोंदी व वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या बारकोड पावत्यांपैकी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रतीसह हिशेब सादर करावा. लिलावधारकांने विहित मुदतीत मासिक विवरणपत्रे सादर केली नाही तर त्याचा ठेका रद्द करण्याचा तसेच त्यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

7) वाळू गटाच्या स्थळांचे एकत्रिकरण करणे किंवा विभाजन करण्याचा संपुर्ण अधिकार हा जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवले आहेत.

8) वाळुस्थळावर संगणक इंटरनेट कनेक्शन आणि किमान 24 तासाचे बॅकअप असणारे इन्व्हर्टर किंवा अखंडीत वीज पुरवठयाची सुविधा असणे आवश्यक आहे. सदर सर्व सेटअप एका तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी पुरविण्यात आलेल्या बंद खोलीमध्ये असावेत जेणेकरुन ऊन, वारा व पाऊस यापासून त्याचे संरक्षण होईल. सदर संगणक हे 24 तास/पूर्ण वेळ इंटरनेटशी जोडलेले असले पाहिजेत व ते सुस्थितीत सुरु असावे.

9) वाळू ठेकेदारांनी खाली क्रमांक a, b, c & d मध्ये नमूद केल्यानुसार सॉफटवेअर परस्पर तयार करुन वापरावे लागेल. तथापि website आणि त्याच्यामधील data हा secure असला पाहिजे आणि सर्व अधिका-यांना त्यामध्ये कायम access असला पाहिजे. तथापि त्यात खाली नमूद सुविधा (Features) असणे आवश्यक राहील. यापेक्षा वेगळया व अधिक चांगल्या प्रकारच्या सुविधा असणारे सॉप्टवेअर वापरण्यास हरकत नाही. मात्र त्या सुविधा (Features) नमूद केलेल्या सुविधा पेक्षा अधिक चांगल्या कशा आहेत ते वाळू ठेकेदारास लेखी कळवावे लागेल आणि त्याबद्दल वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

a) सॉफ्टवेअर हे ऑनलाईन राहील, ऑफलाईन नाही. तसेच सॉफ्टवेअरमध्ये (संबंधित वेबसाईटमध्ये) संबंधित वाळु ठेक्याबद्दलची सर्व मुलभूत माहिती सुरुवातीलाच नोंदविली गेली पाहिजे.उदाहरणार्थ :-

   i) वाळु ठेक्याची जागा
   ii) वाळु ठेकेदाराचे नाव
   iii) ठेक्याचा कालावधी
   iv) एकूण उचलण्यासाठी मंजुर करावयाचा साठा इत्यादी
   v) ठेका मंजूरी आदेश क्रमांक
   vi) सॉफटवेअरमध्ये वाळू ठेक्याचा पुर्ण हिशोब ठेकेदार निहाय / ऑर्डर निहाय असण्याची व्यवस्था असावी.
   vii) इत्यादी, वरील सर्व डाटा बारकोड स्कॅन केल्यानंतर संगणकात ऑनलाईन उपलब्ध व्हावा.

b) वाहतूकदाराला वाळू विकताना संबधित ठेकेदारांने बारकोडेड पावती स्कॅन करुन ऑनलाईन जनरेट झालेला युनिक क्रमांक पावतीवर टाकावा व स्वाक्षरी करावी. सदर युनीक कोड जनरेट होण्यापूर्वी पुढील माहिती संगणकात ऑनलाईन अदयावत करणे आवश्यक राहिल.

   i) वाहन क्रमांक
   ii) वाहन चालकाचे नांव व मोबाईल क्रमांक
   iii) वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स नंबर
   iv) वाहन परवाना (परमीट) क्रमांक
   v) एकुण ब्रास
   vi) वाळू जेथे नेण्यात येणार आहे ते ठिकाण
   vii) इतर आवश्यक माहीती

c) अशा प्रकारे प्रत्येक पावतीची नोंद करताना त्यासाठी भरण्यात आलेली माहिती ही आपोआप मध्यवर्ती (central) सर्व्हरवर नोंद झालेली असावी जेणेकरुन ती माहिती जिल्हाधिकारी आणि अधिनस्त असणारे सर्व अधिकारी यांना वेळोवेळी पाहता येईल.

d) याशिवाय जिल्हाधिकारी वेळोवेळी सांगतील त्या अटी व नियम (Features) लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

10) वाळू भरलेली गाडी वाळू ठेक्यावरुन सोडताना प्रथम त्याला देण्यात आलेली पावती स्कॅनिंग करुन घ्यावी अन्यथा पावती अवैध समजण्यात येईल. ज्यांना वाळू विकली ते कोणत्या गावाला वाळू घेऊन जाणार त्याचे स्थानही पावती देताना नमुद करणे आवश्यक आहे.

11) प्रत्येकवेळी ठेक्यावर 24 X 7 तास चालणारे CCTV Camera बसविणे आवश्यक राहिल. किमान 10 सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावणे आवश्यक आहे. सदर CCTV Camera अशा पध्दतीने बसवावे की त्यात पुढील सर्व जागा cover होतील.

I. ज्याठिकाणी पावती फाडण्याचे काम होते ती जागा.

II. वाळु ठेक्याच्या स्थळावरुन आणि वाळू साठाविण्याच्या spot वरुन ज्या ठिकाणाहून गाडया बाहेर निघू शकतात व आत जाऊ शकतात अशा सर्व मार्गावर **(entry & exit points)**, ज्या ठिकाणी वाळू उत्खनन होते अशा जागी अशाप्रकारे CCTV Camera लावणे आवश्यक आहे की, त्या वाहनांचा गाडी क्रमांक त्यामध्ये नोंदविला जाईल. सर्व ठेके सुरु झाल्यापासून संपेपर्यंत संपूर्ण ठेक्याचे बॅकअप कायमस्वरुपी जतन केले जाईल.

III. वाळु ठेक्याची संपूर्ण जागा cover होतील अशा उंच ठिकाणी CCTV Camera लावावेत की जेणेकरुन संपूर्ण जागा cover करता येईल.

IV. प्रत्येक ठेकेदारानी वाळू ठेक्यांच्या CCTV Camera मधील फूटेज प्रत्येक आठवडयाला जिल्हाधिकारी कार्यालयास, संबधित उपविभागीय कार्यालय व तहसिल कार्यालयास सी.डी.मध्ये किंवा पेनड्राईव्ह किंवा External Hard Disk मध्ये सादर करावीत.

V. CCTV Camera चे resolution इतके जास्त राहिल की, माणसांचे चेहरे स्पष्टपणे ओळखता आले पाहिजेत आणि गाडयांचे नंबरही स्पष्टपणे दिसले पाहिजे.

12) प्रत्येक वाळुसाठयापासून बाहेर निघण्यासाठी नदीपात्राच्या दोन्ही बाजूला तहसिलदार मान्यता देतील तेवढेच entry & exit points (आत व बाहेर निघण्याचे मार्ग) असतील. एका स्पॉटवर नदीच्या एका बाजूला जास्तीत जास्त 1 मार्गाची परवानगी देण्यात येईल. (आत येणारा एक व बाहेर जाणारा एक मार्ग) याशिवाय इतर मार्ग वाळुस्थळांच्या ठिकाणी असल्यास ते अशा पध्दतीने बंद करावे लागतील की त्याठिकाणाहून कोणत्याही वाहनाची वाहतूक करणे शक्य होणार नाही. त्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना ठेकेदारांनी स्वत: करावी. उदा. मोठे बोल्डर टाकणे, च-या खोदणे, इत्यादी ठेकेदाराने स्वत:च्या खर्चाने करणे आवश्यक राहील. तथापि, एखाद्या वाळू स्थळाच्या ठिकाणी यापेक्षा अधिक रस्ते आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यास त्यावर विचार करण्यात येईल. मात्र अंतिम निर्णय जिल्हाधिकारी यांचा राहील.

13) तपासणी सुविधेबाबत:- वाळू वाहून नेणा-या ट्रक सोबतच्या वाहतुक पावतीची तपासणी Q.R. कोड, Bar कोड, invoice कोड (unique code) किंवा QR कोड हे स्कॅनरगन किंवा मोबाईल कॅमेराद्वारे तपासणे शक्य असले पाहिजे. तसेच यासाठी Android आणि iOS वर मोबाईल ॲप उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, जे की कोणालाही मोफत डाऊनलोड करता आले पाहिजे. या ॲपवर invoice code किंवा bar code किंवा गाडी क्रमांक टाकल्यास वाहतुक पावती valid आहे किंवा invalid आहे ते इतर सर्व माहितीसह दाखवता आले पाहिजे. त्याचप्रमाणे invoice code आणि गाडी क्रमांक SMS करून पावती valid आहे किंवा invalid आहे हे तपासणे शक्य असले पाहिजे.

14) वाळू स्थळावर नाईट व्हीजन CCTV कॅमेरे व रात्रीच्या वेळेस उघडया डोळयांनी दिसेल अशा प्रकारची प्रकाश व्यवस्था (उदा.हॅलोजन लाईटची) करण्यात यावी.

15) वाळू ठेका हा ई-लिलाव (e-Auction) आणि ई-निविदा (e-Tender) या दोन्ही पध्दतीने होणार आहे. यापैकी ज्यामध्ये अधिक दर प्राप्त होतील त्यांना ठेका देण्यात येईल. सुरुवातीला दि.06.03.2019 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ऑनलाईन ई-निविदा (e-Tender) स्वीकारण्यात येतील. त्यानंतर सदर ई-निविदा (e-Tender) न उघडताच, ई-लिलाव (e-Auction) सुरु करण्यात येईल. खुला लिलाव (e-Auction) संपल्यावर ऑनलाईन (Online) आणि प्राप्त झालेल्या ई-निवीदा व ई-लिलाव अशा दोन्ही प्रकारच्या निविदा उघडण्यात येतील. या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच ई-निविदा आणि ई-लिलाव या पैकी ज्यामध्ये सर्वाधिक बोलीची रक्कम नमूद असेल त्या ठेकेदारास लिलाव देण्यात येईल.

16) वाळू स्थळाचा ताबा देण्यासाठी अटी,शर्ती मध्ये शिथिलता व कालावधीमध्ये फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

17) वाळू वाहतूक करणा-या सर्व वाहनाधारकाकडे तपासणीच्यावेळी वाहनांची सर्व मुळ कागदपत्रे सोबत असणे आवश्यक आहे. (उदा.आर.सी.बुक, कर परवाना, योग्यता प्रमाणपत्र,विमा,पीयुसी इ.)

18) वाळू वाहतूक करणा-या वाहनांवर सर्व बाजूने रिफलेक्टीव्ह टेप लावलेला असणे आवश्यक आहे.

19) वाळू वाहतूक करणा-या वाहनांचे मुळ बांधणीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

20) वाळू वाहतूक करताना आरटीओ अधिका-यांना तपासणीच्यावेळी वाळू रॉयल्टीचे वाहतूक पास दाखविणे बंधनकारक राहील

21) वाळू वाहतूक वाहनाचे भार क्षमतेपेक्षा जास्त असू नये.

22) वाळूस्थळावरुन करण्यात आलेल्या उत्खननाबाबचा अहवाल दर आठवडयाला जिल्हा कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

23) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

24) आपणास ताबा देण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये उत्खनन व वाहतुकी दरम्यान या आदेशातील अटी शर्तीचा किंवा मा.राष्ट्रीय हरित न्यायाधीकरण यांच्या आदेशाचे उल्लंघन झालेले निदर्शनास आल्यास वा तक्रार प्राप्त झाल्यास याबाबत

चौकशीअंती उक्त अटी व शर्तीचे भंग केल्याचे निष्पन्न झाल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरुन लिलाव रद्द करुन, अनामतपोटी जमा केलेली रक्कम जप्त करुन करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

25) राज्य पर्यावरण विभागाने मंजुर केलेल्या पर्यावरण व्यवस्थापन आराखडयात नमुद केलेप्रमाणे रक्कम अदा आवश्यक राहील व सदर सर्व रक्कमा किती भराव्या लागतील याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (गौणखनिज शाखा) येथुन माहिती प्राप्त करुन भरणा करणे घेणे आवश्यक राहील. याव्यतिरिक्त शासनाकडुन शासन देय रक्कमाबाबत कोणतेही फेरबदल प्रस्तावित केले गेलेस ते सर्व लिलावधारकास बंधनकारक राहतील.

26) लिलावधारकास त्याच्या स्वखर्चाने त्याला आदेश केलेल्या वाळूस्थळांचे जिल्हास्तरावरील पथकामार्फत तपासणीकामी सदर पथकाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

वर नमुद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक असुन कोणत्याही अटी व शर्तीचे भंग केलेस लिलावधारकास कोणतेही पुर्वसुचना न देता लिलावधारकास मंजुर वाळूस्थळाचा ठेका रद्द करुन पर्यावरण सरंक्षण अधिनियम 1986 मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) (8) मधील तरतुदीनुसार कारवाई करुन त्यांने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासनजमा करणेचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

## (क) करारनामा

i) लिलावधारकाने निविदा अधिसूचना सर्वसाधारण निर्देश विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहित करारनामा करुन घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

ii) करारनामा कालावधीमध्ये सार्वजिनक हितार्थ दिलेल्या निर्देशाचे तसेच आणखी अटी शर्ती एकतर्फी लादण्यास जिल्हाधिकारी सक्षम राहतील व त्याचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

iii) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सही/*****
**(डॉ.राजेन्द्र भोसले** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**